# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण


४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.


क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/2749 दिनांक : ३ सप्टेंबर,१९९९

## तांत्रिक परिपत्रक क्र.२७

विषय : अतिरिक्त बाबींच्या (Extra Items) मंजुरीच्या अधिकारात कपात

पाणी पुरवठा कार्यक्रमास प्राधान्य देवून शासनाने महाराष्ट्र राज्य मार्च,२००० पर्यंत टँकरमुक्त करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर पाणी पुरवठा योजनेचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. या महत्वाकांक्षी व समयबध्द कार्यक्रमाच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना असलेल्या अतिरिक्त बाबींच्या मंजुरीचे (Approval to extra items) अधिकाराबाबत फेर वेचार करण्याचे प्राधिकरणाच्या विचाराधीन होते. या अनुषंगाने मा.मंत्री महोदयांशी तसेच निविदा समितीच्या समेच्या झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने निविदांतर्गत अतिरिक्त बाबींच्या मंजुरीचे (Extra Items) अधिकार खालीलप्रमाणे राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता | - | काहीही अधिकार नाहीत. |
| २) | अधीक्षक अभियंता | - | प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी जास्तीत-जास्त रु.२ लाख वा निविदा स्वीकृतीच्या किंमतीच्या १०% यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेपर्यंत |
| ३) | प्रादेशिक मुख्य अभियंता | - | प्रत्येक अतिरिक्त बाबींसाठी जास्तीत-जास्त रु.१० लाख वा निविदा स्वीकृतीच्या किंमतीच्या १०% यापैकी जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेपर्यंत. |
| ४) | सदस्य सचिव(तांत्रिक) | - | पूर्ण अधिकार परंतु, संबंधित योजनेसाठी विचाराधीन अतिरिक्त बाबींवरील खर्च व त्यापूर्वी मंजुर केलेल्या सर्व अतिरिक्त बाबींची रकम विचारात घेता होणारा एकुण खर्च मंजुर योजनेच्या किंमतीच्या १०% किंवा रु.१ कोटी यापेक्षा जास्त असू नये. |

टिप :- ज्या प्रकरणी एकूण अतिरिक्त बाबींपोटी होणारा खर्च हा मंजुर योजनेच्या किंमतीच्या १०% किंवा रु.१ कोटीपेक्षा जास्त असेल अशा सर्व प्रकरणी अतिरिक्त बाबींच्या मंजुरीचे प्रस्ताव प्राधिकरणाला सादर करावेत.

वरील अधिकार या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहतील.

3/9/99
(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव(तांत्रिक)

प्रत : विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई